तरुण भारत मंगळवार, ६ मे २०२५

# 'रवळनाथ'च्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात १० टक्के वाढ

**गडहिंग्लज :** येथील रवळनाथ को-ऑप.हौसिंग फायनान्स सोसायटीच्या



कायम सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात १० टक्के वाढ करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून ही वाढ देण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. सभासदांचा विश्वास, कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि परीश्रम यामुळे संस्थेच्या प्रगतीचा चढता आलेख कायम ठेवला आहे. संस्थेचा संमिश्र व्यवसाय १०६२ कोटीचा झाल्याने कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ देण्याचा निर्णय संचालक मंडळांने घेतला असल्याची माहिता चौगुले यांनी दिली. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जात असून यासोबत प्रोव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, पेन्शन, मेडिक्लेम, पगारी रजा, बोनस आदी सेवा, सुविधा दिल्या जातात. या निर्णयामुळे डीएमध्ये वाढ केल्याने कर्मचाऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे, सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह व्ही. के. मायदेव उपस्थित होते.